Sunteck

| PUBLICATION | Deshonnati | EDITION | - |
|---|---|---|---|
| DATE | 29.4.2014 | PAGE.NO. | - |
| TITLE | Piramal Sunteck Luxurious ‘Signia Skys’ | SUPPLEMENT | - |

# पिरॅमल-सनटेकचा लक्झरिअस ‘सिग्निया स्काय’

## सुजान रोशनद्वारा डिझाईन

*प्रतिनिधी / २८ एप्रिल*

**नागपूर :** मेट्रो सिटीच्या उंबरठ्यावर असलेल्या उपराजधानीत मुंबईच्या धर्तीवर 'लक्झरिअस' सुविधा मिळाव्यात, असा मानणारा मोठा वर्ग वाढत आहे. या वर्गाला आकर्षित करण्यासाठी पिरॅमल-सनटेक रिॲलिटीतर्फे सर्वसुविधायुक्त लक्झरिअस लिव्हिंग असलेला 'सिग्निया स्काय' हा महत्त्वाकांक्षी प्रोजेक्ट सदर-छावणी येथे साकारत आहे.

या प्रोजेक्टमध्ये प्रसिद्ध सेलिब्रिटी इंटेरिअर डिझाईनर सुसान रोशन यांनी आकर्षक व नाविण्यपूर्ण अंतर्गत सजावटीची भर घातली आहे. पिरॅमल-सनटेक रिॲलिटीचा उपराजधानीतील हा पहिलाच प्रोजेक्ट असल्याचे संचालक कमल खेतान यांनी आज पत्रपरिषदेत सांगितले.

या प्रोजेक्टबाबत बोलताना प्रसिद्ध आंतरसजावट तज्ज्ञ सुजान रोशन यांनी सांगितले की, प्रशस्त परिसर,





निसर्गरम्य वातावरण, आकर्षक अंतर्गत सजावट, वातानुकूलित निवास, आबालवृद्धांसाठी करमणुकीच्या सर्वसोयी सुविधा आणि वातावरणाला पोषक असा हा प्रोजेक्ट आहे. 'सिग्निया स्काय' या लक्झरिअस निवासी संकुलाच्या अंतर्गत सजावटीला वास्तुशास्त्रासह विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. मुंबई, दिल्ली, जयपूर या शहरात उभारण्यात आलेल्या संकुलात आकर्षक सजावट व घरात प्रसन्नता यावर भर देण्यात आला आहे. ३ हजार ८०० चौरस फूट जागेत 'सिग्निया स्काय' उभारण्यात येत आहे. ४ बीएचके फ्लॅटमध्ये आकर्षक सजावटीसह वेगवेगळया पद्धतीचे फर्निचर राहणार आहे. ग्राहकांच्या पसंतीनुसार घरातील अंतर्गत सजावट बदलली जाईल. एकंदरीत हे संकुल इतरांपेक्षा नक्कीच वेगळे व आकर्षक ठरणार आहे. स्वयंपाक घर, लँडस्केप, उद्यान, जीम, स्विमिंगपुल, हेल्थ क्लब, योगा केंद्र, व्यापारी संकुल आणि सुरक्षा आदी सुविधा वैशिष्ट्यपूर्ण राहणार असल्याचे सुजान रोशन यांनी सांगितले.

या निवासी संकुलातील अंतर्गत सजावटीबाबत प्रसिद्ध सिनेअभिनेता कबीर बेदी यांनी सुजान रोशन यांच्याशी संवाद साधला. यावेळी सनटेकचे संचालक कमल खेतान व सर्वेश अग्रवाल उपस्थित होते.